मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 'हरित सेतू' प्रकल्प ठरतोय शहर विकासाचा नवा मानदंड

## सायकल ट्रॅक, सुरक्षित पदपथ व पर्यावरणपूरक वाहतुकीमुळे नागरिकांच्या जीवनात सुलभता

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडी प्राधिकरण परिसरात राबविण्यात येणारा हरित सेतू प्रकल्प हा शहराच्या नियोजनबद्ध व पर्यावरणपूरक विकासाच्याहष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरत आहे. या प्रकल्पामुळे वाहतूक, सुरक्षितता आणि सार्वजनिक सुविधा यामध्ये सकारात्मक बदल घडून येत असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सुलभता निर्माण होत आहे. स्वतंत्र सायकल ट्रॅक व पदपथामुळे सायकलस्वार आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षेला महत्त्व दिले गेले आहे.



हरीत सेतू प्रकल्पांतर्गत चालणाऱ्या नागरिकांसाठी सुरक्षित पदपथ, सायकलस्वारांसाठी स्वतंत्र सायकल ट्रॅक तसेच, सार्वजनिक जागांचे सुयोग्य नियोजन करण्यात येत आहे. यामुळे वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन पर्यायी, पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन मिळत आहे. या प्रकल्पामुळे रस्त्यांची मांडणी अधिक शिस्तबद्ध झाली असून, पादचाऱ्यांची सुरक्षितता वाढली आहे. नागरिकांना चालण्यासाठी, सायकल चालवण्यासाठी व मोकळ्या जागांचा वापर करण्यासाठी सुस्थितीत सुविधा उपलब्ध होत आहेत.

सद्यस्थितीत निगडी, प्राधिकरण परिसरातील रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून, उर्वरित भागातील रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रशासन आणि नागरिक यांच्या समन्वयातून हरीत सेतू प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येत असून, परिसरातील नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत होत आहे. निगडी प्राधिकरण भाग अधिक स्वच्छ, सुरक्षित, शिस्तबद्ध व नागरिक केंद्रित बनवण्याच्या दिशेने हा प्रकल्प एक आदर्श ठरत आहे, असे नागरिकांचे मत आहे.

### पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन

» हरीत सेतू प्रकल्पांतर्गत चालणाऱ्या नागरिकांसाठी सुरक्षित पदपथ, सायकलस्वारांसाठी स्वतंत्र सायकल ट्रॅक तसेच, सार्वजनिक जागांचे सुयोग्य नियोजन करण्यात येत आहे. यामुळे वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन पर्यायी, पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन मिळत आहे. या प्रकल्पामुळे रस्त्यांची मांडणी अधिक शिस्तबद्ध झाली असून, पादचाऱ्यांची सुरक्षितता वाढली आहे. नागरिकांना चालण्यासाठी, सायकल चालवण्यासाठी व मोकळ्या जागांचा वापर करण्यासाठी सुस्थितीत सुविधा उपलब्ध होत आहेत. त्यामुळे आरोग्यदायी जीवनशैलीकडे नागरिकांचा कल वाढत असल्याचे चित्र दिसत आहे.

# मोशीचे ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज: भक्ती आणि शक्तीचा चैतन्यमय वारसा

## संपूर्ण पंचक्रोशीचे श्रद्धास्थान असलेले श्री नागेश्वर महाराजांचे भव्य आणि विलोभनीय मंदिर वसलेले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे-नाशिक महामार्गावरील मोशी गावातून श्री क्षेत्र आळंदीकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर, संपूर्ण पंचक्रोशीचे श्रद्धास्थान असलेले श्री नागेश्वर महाराजांचे भव्य आणि विलोभनीय मंदिर वसलेले आहे. हे मंदिर केवळ एक धार्मिक वास्तू नसून मोशी ग्रामस्थांच्या एकता, भक्ती आणि शक्तीचा जिवंत संगम आहे.



या स्थानाचा इतिहास अत्यंत श्रद्धापूर्ण असून जुन्या पिढीतील जाणकारांच्या सांगण्यानुसार, नाशिकच्या कुंभमेळ्याहून परतत असताना एका आखाड्यातील एक साधू महाराज आजारी पडल्याने मोशीतच स्थिरावले, जे पुढे श्री नागेश्वर महाराज म्हणून प्रसिद्ध झाले. सुरुवातीच्या काळात गावकऱ्यांनी त्यांच्यासाठी गवत आणि बांबूचा एक मठ तयार केला होता. महाराज गावातून पाच घरी माधुकरी मागून आपला उदरनिर्वाह करत आणि दक्षिणेकडील आमराईत विरक्त भावनेने ध्यान, जप व तपामध्ये मग्न राहत असत. एकदा एका महिलेकडून अन्नाचा अनावधानाने अवमान झाल्यामुळे व्यथित होऊन महाराजांनी गाव सोडण्याचा निर्णय घेतला, परंतु गावकऱ्यांच्या विनंतीवरून त्यांनी सर्वांना 'सर्वकल्याणमभवतु' असा आशीर्वाद दिला. त्यानंतर त्यांनी इंद्रायणी काठी 'काकडे वडगाव' येथे संजीवन समाधी घेतली. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मोशीकरांनी तिथे मंदिर उभारले असून, त्यांच्या तपोभूमी असलेल्या आमराईत शेकडो वर्षांपासून अखंड नंदादीप आजही तेवत आहे. मोशीच्या या पावन भूमीत भक्तीसोबतच शक्तीचाही मोठा जागर केला जातो.

दरवर्षी श्री नागेश्वर महाराजांच्या भंडारा उत्सवानिमित्त आणि श्री भैरवनाथ महाराज यात्रेनिमित्त येथे उत्साहाचे वातावरण असते. या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'जंगी कुस्ती आखाडा' आणि 'बैलगाडा शर्यत'. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून नामवंत पैलवान या आखाड्यात आपले कसब आजमावण्यासाठी येतात, तर वेगवान बैलगाडा शर्यतींमुळे गावाच्या परंपरेला एक वेगळीच धार मिळते. या यात्रेदरम्यान मानाच्या ओटीसाठी भाविकांमध्ये मोठी चुरस असते आणि लाखांच्या बोली लावल्या जातात, ज्यातून मिळणारा निधी मंदिर आणि समाजकार्यासाठी वापरला जातो. यात्रेत हजारो भाविक महाप्रसादाचा आणि भंडाऱ्याचा लाभ घेतात. तसेच रघुवीर खेडकर आणि कांताबाई सातारकर यांच्यासारख्या नामांकित कलाकारांचे लोकनाट्य व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून लोककलेचे जतन केले जाते.

मोशीला ज्ञानोबा-तुकोबांच्या वारीचा मोठा वारसा लाभलेला असून, वारकरी सेवा आणि अध्यात्माची ही परंपरा नामदेव काशीबा अल्हाट यांच्यासारख्या परमभक्तांच्या वंशजांनी आजही तितक्याच निष्ठेने जपली आहे. अशा प्रकारे, धार्मिक विधी, साहसी खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून श्री नागेश्वर महाराज मोशीच्या सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत

# पिंपरी-चिंचवडमध्ये 300 स्कूल वाहनांवर कारवाई

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बस, व्हॅन व रिक्षांवर आरटीओचा दंडात्मक दणका

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात विद्यार्थ्यांची धोकादायकपणे वाहतूक केली जाते. विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात येऊ नये, म्हणून परिवहन विभागाकडून स्कूल बसेससाठी नियमावली केलेली असते; मात्र या नियमांकडे स्कूल बसचालकांकडून सर्रासपणे दुर्लक्ष केले जाते. अशा 300 वाहनांवर गेल्या वर्षभरात प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई केली आहे. यातून 25 लाख 22 हजार 500 एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.




### क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची वाहतूक

» परिवहन विभागाच्या वतीने गेल्या वर्षभरात क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक करणे, चालकाकडे बॅच नसणे, कर, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र नसणे, वाहनांच्या आसनक्षमतेमध्ये बदल करणे, वाहतुकीच्या नियामांचे उल्लंघन करणाऱ्या 300 वाहनांवर वर्षभरात प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई केली आहे. या कारवाईतून 25 लाख 22 हजार 500 एवढा दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती आरटीओच्या वतीने देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी राज्य शासनाने नियमावली तयार केली आहे. या नियमावलीनुसार विद्यार्थ्यांची वाहतूक करणे बंधनकारक आहे. शहरामध्ये रिक्षा, व्हॅन व बसला विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी परवाना दिला जातो. दोन्ही वाहने संपूर्ण पिवळ्या रंगात असावेत आणि मध्ये विटकरी रंगाचा पट्टा असणे बंधनकारक आहे. त्याशिवाय आरटीकडून विद्यार्थी वाहतुकीचा परवाना दिला जात नाही. मात्र, विद्यार्थी वाहतूक नियमांचे उल्लघंन करणाऱ्या बस, व्हॅन, रिक्षा चालकांवर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कारवाई केली आहे.

प्रत्येक स्कूलबसमध्ये विद्यार्थ्यांसाठी कठडे असावेत, प्रथमोपचार पेटी, अग्निशमन यंत्रणा, मध्यम आवाजाचा हॉर्न, मार्गाचे फलक असावेत. तसेच, बसचा वेग हा ताशी 50 किलोमीटर इतका निश्चित करण्यात आला आहे. शहरात धावणारे अशा वाहनांची तपासणी वेळोवेळी आरटीओच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

मात्र, अनेकदा वाहनधारकांकडून प्रवाशांची आर्थिक लूट केली जाते. याबाबत नेमकी तक्रार कोठे करायची याची प्रवाशांना माहिती नसते. त्यामुळे पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात त्याची तक्रार करा, असे आवाहन आरटीओच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

### बहुतांश बसमध्ये परिचालक गायब

» शालेय विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि बसमध्ये चढ-उतार करण्यासाठी वाहनांमध्ये परिचालक असणे बंधनकारक आहे. मात्र, बहुतांश बसमध्ये परिचालक नसतात. तसेच, कर्मचारीदेखील नसतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात येऊ शकते.

"विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी परिवहन विभागातर्फे नियमित प्रयत्न करण्यात येतात. वाहनचालकांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वाहनचालकांना तसेच परिचालकांनादेखील प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच, खासगी वाहनांवर कारवाई केली जाते.

- संदेश चव्हाण, सहपरिवहन आयुक्त

# कंत्राटी महिला सफाई कर्मचाऱ्यांवर रात्रपाळीची सक्ती; सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

## पिंपरीतील महिला कामगारांचा संताप, ड्युटी बदलली नाही तर महापालिका भवनासमोर आंदोलनाचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी शहर, उपनगरांतील कंत्राटी महिला सफाई कर्मचाऱ्यांवर आरोग्य विभागाकडून मागील सहा महिन्यांपासून रात्रपाळीची ड्युटी लावण्यात आली आहे. यामुळे महिल्यांच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. महापालिका आरोग्य विभागाकडून मोठा अन्याय केला जात आहे. यामुळे महिला कर्मचाऱ्यांच्या कामाच्या ड्युटीमध्ये बदल करावा, अशी मागणी होत आहे.



### रात्रपाळीमुळे महिला सफाई कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना

» पिंपरी शहर व उपनगरांतील कंत्राटी महिला सफाई कर्मचाऱ्यांवर मागील सहा महिन्यांपासून सातत्याने रात्रपाळीची ड्युटी लादण्यात येत असल्याची तक्रार पुढे आली आहे. महापालिका आरोग्य विभागाकडून या महिलांना नियमितपणे रात्रीच्या शिफ्टमध्ये कामावर पाठवले जात असल्यामुळे त्यांच्या सुरक्षेचा तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा प्रश्न निर्माण झाला आहे. महिलांनी ड्युटीमध्ये बदल करून द्यावा, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागात कंत्राटी महिला सफाई कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार न मिळणे, कामावरून अचानक काढून टाकणे, कामाच्या ठिकाणी गैरवर्तन, कमी वेतन आणि सुविधांचा अभाव, इतर कायद्यानुसार मिळणाऱ्या सुविधा न देणे यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. घरामध्ये त्यांना वेळ देण्यासाठी शिफ्टमध्ये काम करणे सहाजिक होते; परंतु आरोग्य विभाग त्यांच्या सामाजिक-आर्थिक समस्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर सतत रात्रपाळीची ड्युटी लादत आहे.

तरी सफाई महिला कर्मचाऱ्यांनी ड्युटी बदलून मागितली तर अचानक त्यांना पूर्वसूचना न देता कामावरून कमी केले जाते. वेतनात काटकसर करून वेतन पुढे ढकलणे या सारख्या अडचणींचा सामना करावा लागतो.

तरी महापालिका आरोग्य विभागाने या कंत्राटी महिला साफसफाई कर्मचाऱ्यांची तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी सफाई कामगार संघटनेने महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

आम्हाला गेले सहा महिने झाले रात्रपाळीची ड्युटी जबरदस्तीने लादली आहे. रात्रपाळीला ड्युटीला येताना चौकाचौकांत तळीराम बसलेले असतात. त्याची भीती वाटते. शिवाय रात्रपाळीला काम, दिवसा मुलांची शाळा त्यांची तयारी, घरातील जबाबदारी यामुळे दैनंदिन शिफ्टमध्ये काम असावे, अशी भावना महिला कामगारांनी व्यक्त केली आहे.

"कंत्राटी महिला सफाई कर्मचाऱ्यांना रात्रपाळीची ड्युटी बंद आहे. दिवसा काही भागात दुकाने चालू असल्याने साफसफाईचे काम करताना अडचणी येतात. त्यामुळे रात्रपाळीला पुरुष सफाई कामगारांकडून काम केले जाते.

- तानाजी दाते, आरोग्य सहायक अधिकारी, क प्रभाग कार्यालय, महापालिकापालिका

"येत्या काही दिवसांत कंत्राटी महिला सफाई कर्मचाऱ्यांना दिवसपाळीची शिफ्टप्रमाणे ड्युटी बदलून देण्याची मागणी महापालिका प्रशासनाला केली आहे. जर अंमलबजावणी न केल्यास काही दिवसांत महापालिका भवन समोर आंदोलन छेडले जाईल..

- सुवर्णा निकम, शहराध्यक्षा अखिल भारतीय मजदूर सफाई

# मिळकतकर अभय योजनेबाबत आयुक्तांचा मोठा निर्णय!

## महापालिका प्रशासनाने मिळकतकर वसुलीसाठी सुरू केलेल्या 'अभय योजने'ला आता 15 मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेचा थकीत मिळकतकर वसूल करण्यासाठी महापालिका प्रशासनाने नोव्हेंबर २०२५ पासून अभय योजना सुरू केली आहे. यामध्ये मिळकतकराच्या थकबाकीवर ७५ टक्के सवलत दिली जात आहे.

महापालिका प्रशासनाने मिळकतकर वसुलीसाठी सुरू केलेल्या 'अभय योजने'ला आता पुढील महिन्यात १५ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अभय योजनेला मुदतवाढ देण्याची मागणी सर्वपक्षीय सभासदांनी सर्वसाधारण सभेत केली होती. त्याला सकारात्मक प्रतिसाद देऊन महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी अभय योजना १५ मार्चपर्यंत सुरु राहील, असे जाहीर केले.

महापालिकेच्या सभासदांनी केलेल्या मागणीनुसार ही मुदतवाढ देण्यात येत असून, मिळकतकराची थकबाकी प्रलंबित असलेल्यांनी या योजनेचा फायदा घ्यावा, असे आवाहन आयुक्त राम यांनी केले आहे. यामुळे आता एक महिना थकबाकीदारांना सवलतीच्या दराने थकलेला मिळकतकर भरण्याची संधी मिळणार आहे.

महापालिकेची विशेष सर्वसाधारण सभा झाली. सभेला सुरुवात होताच महापालिका प्रशासनाने थकीत मिळकतकर वसुलीसाठी सुरू केलेल्या अभय योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. मात्र, अद्यापही अनेकांना याचा लाभ घेता आलेला नाही. त्यामुळे या योजनेला एक महिना मुदतवाढ द्यावी, अशी मागणी काँग्रेसचे नगरसेवक अविनाश साळवे यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नगरसेवक बाबूराव चांदेरे यांनी त्याला पाठींबा दिला.

दरम्यान, काही नगरसेवकांनी विरोधी भूमिका मांडत ही मुदतवाढ नियमितपणे कर भरणाऱ्यांवर अन्यायकारक असल्याचे म्हटले. तर काहींनी या योजनेअंतर्गत दंड व व्याजात सवलत देण्यात येत असल्याने वर्षानुवर्षे थकलेला मिळकत कर भरण्याकडे नागरिकांचा कल वाढत आहे. मात्र, आता मुदत संपत आल्याने अनेक करदाते संभ्रमात असल्याची स्थिती निर्माण झाली असून मुदतवाढ मिळाल्यास थकबाकीदारांकडून कर भरण्याची प्रक्रिया अधिक वेगाने होईल, असा दावा काही सदस्यांनी केला.

'महापालिकेच्या महसूलवाढीसाठी अभय योजनेला मुदतवाढ आवश्यक आहे. अभय योजनेच्या मुदतवाढीबाबत महापौर आणि प्रशासनाशी चर्चा करून निर्णय घेऊ,' असे सभागृह नेते गणेश बीडकर यांनी स्पष्ट केले. महापालिकेची सर्वसाधारण सभा संपल्यानंतर बीडकर यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना पत्र देऊन अभय योजनेला मुदतवाढ देण्याची मागणी केली होती.

मिळकतकराची थकबाकी भरण्यासाठी महापालिका प्रशासनाने सुरू केलेल्या अभय योजनेला एका महिन्यांची मुदतवाढ दिल्यास महापालिकेच्या महसुलात वाढ होतानाच पुणेकरांना देखील फायदा होणार आहे. या योजनेस १५ मार्चपर्यंत मुदतवाढ द्यावी असे सभागृह नेते गणेश बीडकर यांनी पाठविलेल्या पत्रात म्हटले होते. या योजनेला पुणेकरांचा चांगला प्रतिसाद मिळत असून महापालिकेच्या महसुलात वाढ झाली आहे, असेही त्यांनी म्हटले होते. सभासदांच्या भावनांचा विचार करून आणि महापालिकेच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी अभय योजना ला १५ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी काढले.



### सभेत सर्वपक्षीय मागणी; महसूलवाढीवर भर

**» विशेष सर्वसाधारण सभेत काँग्रेसचे नगरसेवक अविनाश साळवे यांनी अनेक करदाते अद्याप लाभ घेऊ शकले नसल्याचे सांगत मुदतवाढ देण्याची मागणी केली. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे बाबूराव चांदेरे यांनी त्यांना पाठिंबा दिला. सभागृह नेते गणेश बीडकर यांनी महसूलवाढीसाठी योजना सुरू ठेवणे आवश्यक असल्याचे नमूद केले. सभेनंतर त्यांनी आयुक्तांना पत्र देऊन मुदतवाढ देण्याची औपचारिक विनंती केली.**

### 'अभय योजने'ला १५ मार्चपर्यंत मुदतवाढ

**» पुणे महापालिकेने थकीत मिळकतकर वसुलीसाठी सुरू केलेल्या 'अभय योजने'ला १५ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या योजनेअंतर्गत मिळकतकराच्या थकबाकीवरील दंड आणि व्याजात ७५ टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येत आहे. सर्वसाधारण सभेत सर्वपक्षीय नगरसेवकांनी मुदतवाढीची मागणी केल्यानंतर महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी हा निर्णय जाहीर केला. नोव्हेंबर २०२५ पासून सुरू असलेल्या या योजनेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.**

### नियमित करदात्यांचा प्रश्न; नागरिकांना आवाहन

**» दरम्यान, काही सदस्यांनी नियमितपणे कर भरणाऱ्यांवर अन्याय होऊ नये, अशी भूमिका मांडली. वारंवार सवलती देण्यामुळे कर भरण्याची शिस्त बिघडू शकते, असे मत त्यांनी व्यक्त केले. तरीही सभासदांच्या भावनांचा विचार करून आणि महापालिकेच्या महसूलवाढीच्या उद्देशाने प्रशासनाने १५ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्याचा आदेश काढला आहे. थकबाकीदारांनी सवलतीचा लाभ घेऊन मिळकतकर भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# पीएमआरडीएमच्या हद्दीत 'डीपी'ऐवजी स्ट्रक्चर प्लॅन; प्रारूप जाहीर करण्याचे आदेश

## आता संपूर्ण क्षेत्रासाठी स्ट्रक्चर प्लॅन तयार करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

प्राधिकरणाच्या हद्दीतील विकास आराखडा (डीपी) रद्द केल्यानंतर आता संपूर्ण क्षेत्रासाठी स्ट्रक्चर प्लॅन तयार करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यासंदर्भातील आदेश नगर विकास विभागाने मंगळवारी जारी केले. सहा महिन्यांच्या आत स्ट्रक्चर प्लॅनचे प्रारूप जाहीर करण्याचे बंधन प्राधिकरणावर घालण्यात आले आहे.

प्राधिकरणाच्या ८१४ गावांच्या नियोजनबद्ध विकासासाठी २०१७ मध्ये विकास आराखडा तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर २ ऑगस्ट २०२१ रोजी प्रारूप विकास आराखडा प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविण्यात आल्या. सुमारे ६७ हजार नागरिकांनी हरकती दाखल केल्या होत्या. सुनावणी प्रक्रिया पूर्ण करून बदलांसह सुधारित आराखडा मे २०२४ मध्ये राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. मात्र न्यायालयीन वादामुळे मंजुरी प्रक्रिया रखडली. दरम्यान, राज्य सरकारने हा आराखडा रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्राधिकरणाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले असून न्यायालयानेही त्यास मान्यता दिली. परिणामी प्रारूप विकास आराखडा अधिकृतरीत्या रद्द करण्यात आला. यानंतर विकास आराखड्याआधी स्ट्रक्चर प्लॅन तयार करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी प्राधिकरणाने शासनाकडे केली होती. नगर विकास विभागाचे उपसचिव प्रणव कर्पे यांनी यास मान्यता देत आदेश जारी केले.




### पायाभूत सुविधांवर भर

**» स्ट्रक्चर प्लॅनच्या पहिल्या टप्प्यात संपूर्ण हद्दीत रस्त्यांचे जाळे निश्चित करण्यात येणार आहे. शहरांतर्गत तसेच आंतर-शहर जोडणी देणारे मुख्य परिवहन मार्ग, पोहोच रस्त्यांची आवश्यक रुंदी आणि प्रादेशिक स्तरावरील वाहतूक नियोजन यावर विशेष भर राहणार आहे.याशिवाय सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, जलशुद्धीकरण प्रकल्प, टाऊन हॉल, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, उद्याने, नागरी सेवा सुविधा, जैवविविधता उद्याने तसेच हिल-टॉप व हिल स्लोप झोनचे संरक्षण या बाबींचाही आराखड्यात समावेश करण्यात येणार आहे.**

# पुणेकरांची वाहतूक कोंडीतून सुटका; प्लान तयार

## लक्ष्मी रस्ता, बाजीराव रस्ता, शिवाजी रस्ता हेरिटेज धर्तीवरील पुनर्रचना, 12 मिसिंग लिंक, 9 कॉरिडॉर प्लॅन व 30 जंक्शन सुधारणा यांचा समावेश

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वाहतूक शिस्तबद्ध, सुरक्षित व भविष्योन्मुख बनविण्यासाठी महापालिकेच्या पथ विभागाने आगामी आर्थिक वर्षासाठी भरीव आणि दूरदृष्टीपूर्ण अर्थसंकल्पीय आराखडा तयार केला आहे. ऐतिहासिक वारसा जपत लक्ष्मी रस्ता, बाजीराव रस्ता व शिवाजी रस्ता यांचे हेरिटेज धर्तीवरील पुनर्रचना डिझाइन केले आहे. त्याअंतर्गत लक्ष्मी रस्त्यावरील गणपती चौक ते कुंटे चौक हा महत्त्वाचा टप्पा पूर्णत्वास नेण्यात येणार आहे. नदीकाठचा आणि शहराच्या दळणवळणासाठी अत्यावश्यक असलेला शिवणे-खराडी रस्ता यंदा प्राधान्याने विकसित केला जाणार आहे. तसेच, 32 प्रमुख रस्त्यांपैकी नऊ महत्त्वाच्या मार्गांसाठी कॉरिडोर इम्प्रूव्हमेंट प्लॅन, तर 30 रस्त्यांवरील गर्दीच्या चौकांसाठी जंक्शन इम्प्रूव्हमेंट प्लॅन राबविण्यात येणार आहे. कात्रज-कोंढवा रस्त्याचे संपूर्ण लांबीचे 50 मीटर रुंदीकरण, मिसिंग लिंक व डीपी रस्त्यांची कामे देखील पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.



### मिसिंग लिंकच्या जागा ताब्यात घेऊन रस्ते तयार करणे

» या आर्थिक वर्षामध्ये शहरातील 12 महत्त्वाच्या मिसिंग लिंकच्या जागा ताब्यात घेऊन त्या विकसित करण्याचे उद्दिष्ट पथ विभागामार्फत ठेवण्यात आलेले आहे. पुणे शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील सर्विस रस्ते वाकड ते कात्रज यादरम्यानच्या जागा टप्प्या-टप्प्याने ताब्यात घेऊन सेवा रस्त्यांचे विकसन करण्याचे काम खात्यामार्फत करण्यात येणार आहे.

पुणे महापालिकेच्या 480 चौ. कि.मी. क्षेत्रात पथ विभागाने 2026-27 या आर्थिक वर्षासाठी सुरक्षित, दर्जेदार आणि वाहतूकक्षम रस्ते या ध्येयाने व्यापक अर्थसंकल्पीय आराखडा सादर केला आहे. रोड अॅसेट मॅनेजमेंट सिस्टम सर्वेक्षणानुसार शहरात 3 मी. ते 60 मी. रुंदीचे एकूण 2273 कि.मी. रस्ते असून, त्यापैकी 32 मुख्य रस्त्यांची लांबी 270 कि.मी. आहे. शहरातील सुमारे 80 टक्के वाहतूक या रस्त्यांवर अवलंबून असल्याने या मार्गांवर दर्जावाढ, सुरक्षितता उपाययोजना, पदपथ दुरुस्ती व वॉकेबिलिटी वाढ, तसेच पावसाळी व ड्रेनेज चेंबर रस्त्याच्या समपातळीत आणण्याची कामे प्राधान्याने हाती घेतली जाणार आहेत. यासाठी अंदाजपत्रकात भरीव तरतूद प्रस्तावित केली आहे.

शहरातील 12 महत्त्वाच्या मिसिंग लिंकच्या जागा ताब्यात घेऊन त्यांचे विकसन, तसेच वाकड ते कात्रजदरम्यान राष्ट्रीय महामार्गावरील सेवारस्ते टप्प्याटप्प्याने विकसित करण्याचा आराखडा आहे. नवले पुलाजवळील सेवा रस्त्यांना अपघात कमी करण्यासाठी प्राधान्य दिले जाईल. नदीकाठचा महत्त्वाचा शिवणे-खराडी रस्ता जास्तीत जास्त विकसित करणे, तसेच कात्रज-कोंढवा रस्त्याचे संपूर्ण 50 मीटर रुंदीकरण पूर्ण करणे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत.

32 मुख्य रस्त्यांपैकी 9 रस्त्यांसाठी कॉरिडोर इम्प्रूव्हमेंट प्लॅन आणि 30 रस्त्यांसाठी जंक्शन इम्प्रूव्हमेंट प्लॅन तयार असून, त्यानुसार कामे सुरू केली जाणार आहेत. गणेशखिंड रस्त्याच्या टप्पा-3 (आरबीआय ते संचेती पूल) साठी भूसंपादनावर भर, विमानतळ रस्ता सीएसआरमधून पूर्ण करणे आणि पीपीपी तत्त्वावर किमान पाच रस्ते विकसित करणे अशी कामे हाती घेतली जातील. गुणवत्ता व गतीसाठी एसओपी तयार करून मिलिंग-रिसर्फेसिंगला चालना दिली जाणार आहे. 'रोड मित्र', 'युवर ऑफिसर' आणि 'ट्रेंचिंग' अॅपचा वापर वाढवून पारदर्शकता व समन्वय साधला जाईल.

### समाविष्ट गावांतील प्रमुख रस्त्याचे सर्वांगीण काम

» चालू वर्षात सर्व रस्त्यांवरील चेंबर समपातळीत आणणे, नादुरुस्त रस्ते व पदपथांची दुरुस्ती आणि नव्या पदपथांची उभारणी हे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. नव्याने समाविष्ट 32 गावांमधील किमान 1 मुख्य रस्ता सर्वांगीण विकसित करण्यात येणार असून, डांबरीकरणापूर्वी पाणीपुरवठा व जलोत्सारण विभागाकडून आवश्यक नलिका टाकण्याचे आणि पथदिव्यांचे नियोजन करण्याचे ठरले आहे.

### नवले पुलाजवळील सेवारस्त्यांची कामे करणार

» नवले पुलाजवळील वाहतूक सुरळीत व्हावी आणि अपघातांचे प्रमाण कमी व्हावे, या दृष्टीने येथील सेवारस्ते प्राधान्याने विकसित करण्यात येणार आहेत. व्हीआयपी रस्त्याचा भाग असलेला गणेशखिंड रस्त्याच्या टप्पा 3 चे काम आरबीआय बँक ते संचेती पूल यादरम्यानच्या टप्प्याचे भूसंपादन बहुतांश प्रमाणात पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे व ताब्यात आलेल्या रस्त्यांच्या विकसनाचे काम हाती घेण्यात येणार आहे.

# महाशिवरात्री निमित्त भाविकांसाठी विशेष बससेवा

## बनेश्वर, निळकंठेश्वर आणि घोरावडेश्वर मंदिरांकडे जाण्यासाठी तीन अतिरिक्त मार्गांवर बसेस धावणार

**पुणे | प्रतिनिधी**

महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर मंदिरांकडे होणारी भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन पीएमपीएमएलकडून रविवारी (दि.15) विशेष बससेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बनेश्वर, निळकंठेश्वर आणि घोरावडेश्वर मंदिरांकडे जाण्यासाठी तीन अतिरिक्त मार्गांवर बसेस धावणार असून, नियमित मार्गांवरील गाड्यांची वारंवारितादेखील वाढविण्यात आली आहे.



महाशिवरात्रीदिनी कात्रज सर्पोद्यान ते बनेश्वर (चेलाडी फाटा), स्वारगेट ते निळकंठेश्वर (बीएसएफ सेंटर) आणि निगडी (पवळे चौक) ते घोरावडेश्वर मंदिर पायथा (शंकरवाडी) या तीन अतिरिक्त मार्गांवर पहाटेपासून बसेस चालविण्यात येणार आहेत. स्वारगेटहून निळकंठेश्वरकडे जाणाऱ्या जादा गाडीची पहिली फेरी पहाटे ३.३० वाजता सुटणार आहे.

निळकंठेश्वर मंदिरांकडे जाण्यासाठी जाण्यासाठी नियमितपणे धावणाऱ्या स्वारगेट ते पानशेत/वरसगाव (क्र. ५२ अ) या मार्गावरील गाड्यांची वारंवारिता १० ते १५ मिनिटांपर्यंत वाढविण्यात आली आहे. अतिरिक्त बससेवेने पहाटेपासूनच भाविकांना सोयीस्कर प्रवासाची सुविधा मिळणार आहे.

घोरावडेश्वर मंदिरांकडे जाण्यासाठी भाविकांसाठी सात मार्गांवर बससंख्या वाढविण्यात आली आहे. कात्रज ते वडगाव मावळ (क्र. २२८), पवळे चौक ते वडगाव मावळ (क्र. ३०५), निगडी ते बेबड ओव्हळ (क्र. ३३२), निगडी ते उर्सेगावमार्गे तळेगाव (क्र. ३४१), निगडी ते उर्सेगावमार्गे परंदवाडी (क्र. ३४२), निगडी ते लोणावळामार्गे कामशेत (क्र. ३६८) आणि निगडी ते टाकवे फळणे फाटा (क्र. ३७१) या मार्गांवर सरासरी १० ते १५ मिनिटांच्या अंतराने बसेस उपलब्ध असतील.

महाशिवरात्रीच्या दिवशी मंदिर परिसरात मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन ही विशेष व्यवस्था करण्यात आली असून, भाविकांनी खासगी वाहनांऐवजी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, असे आवाहन परिवहन मंडळाकडून करण्यात आले आहे.

### बनेश्वरसाठी दर २० मिनिटांनी बस

» बनेश्वर मंदिरांकडे जाण्यासाठी भाविकांसाठी कात्रज ते सारोळा मार्गे कापूरहोळ (क्र. ६), कात्रज सर्पोद्यान ते सासवडमार्गे बालाजी मंदिर केतकावळे (क्र. २९३), कात्रज सर्पोद्यान ते वेल्हे (क्र. २९६) आणि कात्रज सर्पोद्यान ते वांगणीवाडी (क्र. २९६अ) या चार मार्गांवर सरासरी २० मिनिटांच्या वारंवारितेने बसेस उपलब्ध असतील.